# कुटुंबवत्सल

यानें

## आपल्या आयुष्याची सांगितलेली संक्षिप्त हकीकत.

'हिंदु यूनिअन क्लब' च्या एका सभासदानें
छापवून प्रसिद्ध केली.

आवृत्ति दुसरी

मुंबईत
'धी जॉइन्ट स्टॉक प्रिंटिंग प्रेस' मध्यें छापिली
१८८९

किंमत दोन आणे.

# प्रस्तावना.

मद्यमांसनिषेध या विषयाच्या संबंधानें 'फ्रेझर्स म्यागेझिन' नामक इंग्रजी मासिक पुस्तकाच्या जुलई १८७६ च्या अंकांत एका गृहस्थानें आपल्या आयुष्याची संक्षिप्त हकीकत दिली आहे. ती फारच चित्तवेधक असून उपदेशपर आहे. तींत वरील विषयाशिवाय उद्योग, व्यवस्थितपणा, मितव्यय, व स्त्रीशिक्षण यांजपासून व्यवहारांत होणारे जे कांहीं असंख्य फायदे आहेत ते स्पष्ट दिसून येतात. ती वाचल्यापासून आमच्या स्वतांच्या मनावर पुष्कळ बोध झाला व आमच्या वृत्तींतही एकंदरींत बराच फेर पडला. ह्मणून तिचें हें यथामति भाषांतर करून महाराष्ट्रीय जनांस अर्पण केलें आहे. याचा देशबंधूंस चांगला उपयोग होऊन याच्या योगें सन्मार्गाकडे त्यांचें विशेष वळण होईल अशी आशा आहे.

मद्यपानादि दुष्ट व्यसनांनीं जे लोक अगदीं बद्ध होऊन गेले असतील त्यांजकडून या लहानशा पुस्तकाचा जरूर अभ्यास करवावा. ह्मणजे त्यांचें मोहपटल खचित अल्पकाळांत नाहींसें होणार आहे.

---

पहिली आवृत्ति लौकरच खपून गेल्यामुळें व लोकांकडून वेळोवेळीं मागण्या येत असल्यामुळें ही दुसरी आवृत्ति छापून प्रसिद्ध केली आहे. ह्या पुस्तकाच्या गुजराथी भाषांतराची दोन हजारांची एक आवृत्ति थोड्याच काळांत संपून दुसरी आवृत्ति तयार झाली आहे. कानडीमध्ये भाषांतर लौकरच प्रसिद्ध होणार आहे.

# कुटुंबवत्सल.

इंग्लंड देशाच्या उत्तरेस एका लहानशा गांवीं माझा जन्म झाला असून माझें वय आज नाहीं म्हटलें तरी सरासरी साठ पांसष्ट वर्षांचें आहे. माझे केस बहुतेक पिकले आहेत. तरी एखाद्या ज्वान पुरुषाच्यानें देखील माझा हात धरवणार नाहीं. माझा बाप धर्मोपदेशकाचा धंदा करीत असे. त्याला एकंदर बारा मुलें झालीं आणि त्या सर्वांत मी वडील. आह्मीं मोठे कुलीन व घरंदाज अशी आमची पुष्कळ दिवसांपासून प्रसिद्धि असे. तरी माझ्या बापाची मिळकत अतिशय कमी व घरांत मुलांचा बराच सुकाळ,त्यामुळें आह्मां वडील मुलांस लहानपणींच घर सोडून पोटाच्या मागें रस्ता मिळेल तिकडे जाणें भाग पडलें. मला थोडेंसें लिहितां वाचतां येत असे; ह्मणून जवळच एक मोठें व्यापाराचें ठिकाण होतें तेथें एका पेढीवर मला कारकुनीची लहानशी एक जागा मिळाली. यावेळेस माझें वय केवळ चौदा वर्षांचें होतें. पहिल्यानें इकडे मला पगार वगैरे कांहीं मिळत नव्हता. पेढीवर एक मुनीम असे त्याच्या घरीं दोन वेळ जेवावें आणि सांगितलेली चाकरी करावी. अशा रीतीनें मीं सरासरी तीन वर्षें काढलीं. नंतर माझी हुशारी व प्रामाणिकपणा हीं धन्याच्या नजरेस येऊन त्यानें मला महिना वीस रुपयांप्रमाणें पगार सुरू केला. याशिवाय दुपारच्या वेळेस सर्वांबरोबर लागेल तेवढें फराळाचें सामान मिळत असे. दुसऱ्याच्या घरीं फार दिवस राहणें बरोबर नाहीं असें वाटल्यावरून यावेळीं मी स्वतंत्र बिऱ्हाड करण्याचा बेत

केला. अशा वेळेस मद्य मांसनिषेध या विषयावर लिहिलेलीं कांहीं लहान लहान पुस्तकें माझ्या पाहण्यांत आलीं. त्यांत सांगितलेले विचार माझ्या पसंतीला पडले आणि त्यांप्रमाणें राहण्याचा मीं निश्चय केला. यामुळें खाण्यापिण्यांत व्यर्थ जो कांहीं ज्यास्त खर्च लागावयाचा तो न लागून इतर लोकांप्रमाणें एकंदर पेहेराव वगैरे ठेवण्यास मला कोणत्याही रीतीनें अड-चण पडली नाहीं. एवढेंच नव्हे तर तशा ल्हानशा पगारांतून देखील मला थोडे थोडे शिल्केसही पैसे टाकतां येऊं लागले. ज्या मुनीमाच्या घरीं आजपर्यंत माझें जेवणखाण वगैरे सर्व कांहीं होत असे. तेथें महिना तीन रूपये भाड्याची ल्हानशी मीं एक खोली घेतली. तींत घरधन्याची एक रिकामी खाट पडली होती. ती त्यानें वापरण्याकरतां ह्मणून मला दिली. परंतु तिच्यावर गादी किंवा सत्रंजी वगैरे कांहीं सामान नसून तें विकत घेण्यास माझ्याजवळ पैसेही नव्हते. घर सोडलें तेव्हां आईची सक्त ताकीद होती कीं, जे कांहीं आप-ल्यास दोन पैसे मिळतील तेवढ्यामध्येंच होईल तसा निर्वाह करावा, परंतु दुसऱ्याचें कर्ज ह्मणून कधींही काढूं नये. हें तिचें सांगणें माझ्या पक्केपणीं लक्षांत असून त्याप्रमाणें मीं माझें एकंदर वर्तन ठेवलें होतें; ह्मणून आतां गादी किंवा सत्रंजी वगैरे कांहीं एक विकत घेण्याच्या भरीस न पडतां येतेवेळेस त्याच सुज्ञ व ममताळू आईनें सामान खराब होऊं नये ह्मणून त्याच्यावर गोणपाटाचे कांहीं तुकडे बांधले होते ते मीं एकत्र जोडले व त्यांत गवत भरून मऊ व ऊबदार अशी एक गादी तयार केली. पांघरूणाच्या ऐवजीं जुन्या कपड्यांचा उपयोग होत असे. ते मीं रात्रीच्या वेळेस अंगांत घालून

निजावें. जेवणाचा बेत साधा असून त्यांत मद्य व मांस ही अगदीं वर्ज केलीं होतीं. तरी माझे खाण्यापिण्याचे पदार्थ ह्मटले ह्मणजे एकंदरींत उत्तम व शरीरास पुष्टिदायक असेच असत, आणि त्यांत कोणत्याही प्रकारें काटकसर होत नसे. यामुळें जेवणाचा खर्च महिना चार रुपयांहून ज्यास्त न येतां प्रकृति नेहमीं सदृढ राहून वैद्याची बहुधा गरज लागत नसे. अठरा वर्षांचा झालों तेव्हां माझी उंची पांच फूट आठ इंच असून शरीराचा बांधाही उत्कृष्ट जमला होता. डाळ, भाकर, तूप, बटाटे, थोडासा भात, आणि कोबीची किंवा दुसरी कसली तरी एखादी भाजी इतके पदार्थ असले ह्मणजे माझें उत्तम भोजन होत असे. याशिवाय आटांपंधरां दिवशीं घरच्या बागांतील फळांनीं भरलेली आईकडून एखादी पाटी येत असे. त्यांची जरी मला फार आवड असे तरी गाडीचे पैसे चुकविल्याशिवाय तीं मीं कधींही घेऊं नयेत. असो; याप्रमाणें जेवणखर्चाबद्दल रुपये चार, घरभाडें रुपये तीन, व दिवावत्तीवगैरे किरकोळ खर्च रुपये दोन, मिळून महिन्याकांठीं मला एकंदर नऊ रुपये खर्च येत असे. बाकी राहिले रुपये अकरा; ते मी वेळेअडचणीस उपयोगीं पडावे ह्मणून शिलकेस टाकीत असें. अशा रीतीनें दोन तीन महिन्यांच्या आंत माझ्याजवळ तीस पसतीस रुपये जमा झाले. तेव्हां मग मीं कांहीं थोडेंसें सामान खरेदी केलें. त्यांत एक गादी, एक उशी, व कांहीं गोधड्या हीं इतकीं मीं अगोदर घेतलीं. कारण त्यांपासून शरीराची विशेष आबादानी असते. हें सगळें सामान कांहींसें जुनें व वापरलेलें असल्यामुळें त्याजबद्दल मला फारसे पैसे पडले नाहींत. तरी जमविलेलें बहुतेक भांडवल त्यांत नाहींसें

झालें. पुनः एक वर्षपर्यंत वर सांगितल्याप्रमाणें क्रम चालू ठेवला. वर्षाच्या अंतीं माझ्याजवळ पुनः शंभर सवाशें रुपये जमा झाले. आतां गांवांतील चार संभावित लोकांची व माझी ओळख झाली असून चार आठ दिवशीं ते मला भेटण्याकरितां ह्मणून येत असत. ते आले ह्मणजे त्यांना बसायाला खुर्च्या वगैरे कांहीं सामान नसल्यामुळें माझी मोठी अडचण होत असे. ह्मणून त्यांच्याकरितां मीं पांच सहा खुर्च्या खरेदी केल्या व एक मोठी पेटी घेतली. ती अशी कीं, दिवसा तींत सर्व कांहीं सामान राहून मेजाप्रमाणें लिहण्याच्या कामीं तिचा उपयोग करितां यावा व रात्रीच्या वेळेस वर निजण्यास ती उपयोगीं पडावी. गोल्डस्मिथ कवीनें अशा प्रकारच्या पेटीचें आपल्या कवितेंत वर्णन केलें आहे. असो, याप्रमाणें त्या लहानशा खोलींत बसणें उठणें, जेवणें खाणें, व निजणें वगैरे सर्व कांहीं माझा व्यवहार होत असे. शिवाय, पस्तीस चाळीस शेरांची माझी एक मोठी मुद्गलांची जोडी होती. तीही तिकडेच दररोज सकाळीं दरवाजा बंद करून मी फिरवीत असें. शंभर सवाशें हात केल्याशिवाय एक दिवस देखील रिकामा जाऊं नये. ही मेहेनत एकंदरींत माझ्या शरीरास फारच हितावह झाली असें ह्मटलें पाहिजे; आणि ह्मणूनच मीं ती अद्याप थोडी थोडी चालू ठेवली आहे.

शेजारीं एका गृहस्थास एक सुशील व रूपवती अशी कन्या होती. तिची आई लहानपणींच वारली असून बापानें द्वितीय संबंध केला होता, यामुळें घरांत तिला अतिशय त्रास होत असे. बापाची तिच्यावर ममता तर खरीच, परंतु बायकोपुढें त्या बिचाऱ्याचें कांहीं चालत नसे. एखाद्या दासीप्रमाणें

त्या मुलीस घरांत राबावें लागत असून पोटभर नीट खायाला देखील तिला मिळूं नये. तिच्या घरीं माझें नेहमीं जाणें येणें असल्यामुळें माझी व तिची बरीच ओळख झाली होती. दर रविवारीं चहा वगैरे घेतल्यानंतर आह्मीं दोघांनीं मिळून देवळास जावें. तिचा स्वभाव फारच चांगला असून आह्मां उभयतांच्या वयांतही फारसें अंतर नव्हतें. ह्मणून मीं तिच्याजवळ एक दिवस लग्नाची गोष्ट काढली. ती तिला मान्य झाली आणि माझ्याप्रमाणें तिनेंही आपलें एकंदर वर्तन ठेवण्यास सुरुवात केली. जवळ थोडासा पैसा झाला ह्मणजे लौकरच तिच्या बापाच्या सल्ल्यानें सुमुहूर्तावर लग्न लावण्याचा आह्मीं निश्चय केला. तिच्या बापानेंही पहिल्यानें या गोष्टीस आपला रुकार दिला. परंतु त्याच्या बायकोस जेव्हां हा मजकूर समजला तेव्हां तिचें पित्त अगदीं खवळून गेलें. कारण ती मोठी खष्ट बायको होती व तिच्या मनांतून होईल तेवढें त्या मुलीचें नुकसान करण्याचें होतें; आणि याकरितां तिचें एका थेरड्याशीं लग्न लावून देण्याच्या ती बेतांत होती. तिनें नवऱ्यास भलभलत्या गोष्टी सांगून मला घरीं येण्याची बंदी केली, आणि त्या पन्नास वर्षांच्या कपीस आपल्या घरीं आणून ठेविलें. त्याला माझ्या एवढीं सात मुलें होतीं. तरी अद्याप दुसरें लग्न करण्याची त्याची उमेद कमी झाली नव्हती. त्याचें आह्मीं थट्टेनें ह्मातारा मुलगा असें नांव ठेविलें होतें. त्याच्याशीं त्या मुलीचें लग्न लावून देण्याबद्दल त्या बाईनें हरतऱ्हा केली. यामुळें तिचा नवराही आतां थोडें थोडें तिच्यासारखेंच बोलूं लागला. हें पाहून मुलीची तर अगदीं निराशा झाली. तिनें मला वरण्याचा निश्चय केला होता, आणि पुढें

अडचण पडूं नये ह्मणून आतांपासून तिनें माझ्याप्रमाणें मद्य व मांस हीं वर्ज केलीं होतीं. यामुळें जेवणाच्या वेळेस दररोज तिची घरांत थट्टा उडत असे. ती सर्व तिनें मुकाट्यानें सोसून घ्यावी. कांहीं दिवस गेल्यावर बापाची तिनें एकांतीं गांठ घेऊन त्याची थोडीशी कानझाडणी केली. त्यानें पहिल्यानें आमच्या लग्नास आपली संमति दिली होती; ह्मणून त्याच्यानें आतां फारसें बोलवलें नाहीं. तरी केवळ बायकोस संतुष्ट ठेवण्याकरितां त्या ह्मातान्याशीं लग्न लावण्याबद्दल मधून मधून तो तिला सांगत असे. शेवटीं पोरीचा फारच आग्रह पाहून बापाच्या हृदयास थोडासा पाझर सुटला आणि तिचें ह्मणणें त्यानें एकदांचें कबूल केलें. वर्ष दीड वर्षाच्या अवकाशांत मीं माझ्याजवळ बरेच पैसे सांठविले आणि नंतर तिच्याशीं लग्न लावलें. आतां तिच्या बापाचा माझ्यावर फारसा राग नसून आपल्या हातून होईल तेवढी त्यानें मला मदतच केली. मुलीस आपल्या योग्यतेप्रमाणें पोषाख दिला व शिवाय शंभर रुपये रोकड दिले. त्याच्या बायकोलाही केल्या कृत्याचा पश्चात्ताप होऊन आपल्याकडून तिनें चाळीस पन्नास रुपयांचा ऐवज आह्मांस पोंचता केला. तिचीं कांहीं मुलें होतीं त्यांनीं आपापसांत वर्गणी करून धर्मशास्त्राचें एक पुस्तक घेऊन दिलें. आणि त्याच्या मंळपृष्ठावर मद्यमांसनिषेधक अशीं कांहीं वाक्यें लिहिलीं. हें पुस्तक मीं फार जपून ठेवलें असून माझ्या मुलीस वाचण्याकरितां नेहेमीं देत असतों. यामुळें तीं सर्व माझ्याप्रमाणें मद्य व मांस यांचा निषेधच करितात.

लग्न झाल्यावर आह्मीं उभयतां मोठ्या सुखानें व आनंदानें राहिलों. माझी प्राप्ति पूर्वींप्रमाणेंच वीस रुपयांपेक्षां अधिक नव्हती. तरी तेवढ्यामध्येंच माझ्या बायकोनें फार जपून संसार करावा. यामुळें आज हे सुखाचे दिवस आह्मी अनुभवीत आहों. घरधन्याकडून एक दोन जास्त खोल्या घेतल्या. यामुळें घरभाड्याबद्दल आतां सात रुपये जाऊं लागले. जेवणखर्चाबद्दल चार दुणें आठ, व किरकोळ खर्च दोन किंवा तीन रुपये, याप्रमाणें महिन्याकांठीं मला आतां सतरा अठरा रुपये खर्च येऊं लागला. जेवणाचा बेत पूर्वींप्रमाणेंच साधा असे. ओळखीचा एक माळी होता तो आह्मांस लागेल तेवढी फळफळावळ व भाज्या सस्त्या दरानें आणून देत असे. यामुळें कधीं कधीं एक दोन ज्यास्त भाज्या असत. संध्याकाळीं कामावरून थकून आलों ह्मणजे चहा किंवा काफी असे. परंतु ती जरी एखाद्या दिवशीं नसली तरी कोणत्याही प्रकारें अडून राहत नसे. लग्न होऊन एक वर्ष झालें नाहीं तों माझ्या बायकोस एक मुलगा झाला. आजपर्यंत घरांतील सर्व कांहीं काम माझी बायकोच पाहत असे. परंतु आतां मुलाला संभाळून तिच्या एकटीच्या हातून कामाचा निभाव लागणार नाहीं ह्मणून मीं एक मोलकरीण ठेविली. तिला जेवणाशिवाय वर्षाचे बारा रुपये द्यावे लागत असत. आमच्या सहवासामुळें तिलाही मद्य व मांस हीं सोडावीं लागलीं. तरी त्याजबद्दल तिनें कोणत्याही रीतीनें कुरकुर केली नाहीं.

एके दिवशीं पेढीवरील मालकाची बायको आह्मांस भेटण्याकरतां ह्मणून आमच्या बिऱ्हाडीं आली. तिनें आमच्या

घरची एकंदर व्यवस्था पाहून माझा पगार वाढविण्याविषयीं आपल्या यजमानाजवळ शिफारस केली. यामुळें दुसऱ्या महिन्यापासून मला चाळीस रुपयांप्रमाणें पगार मिळूं लागला. उत्पन्न वाढलें ह्मणून त्या मानानें मीं माझा खर्च मात्र वाढविला नाहीं. माझी बायकोही मोठ्या बाताबेतानें खर्च करणारी असून खोटी बडेजावी भोगण्याची तिला एकंदरीत हौस नव्हती. यामुळें पांच सहा महिन्यांच्या आंत माझ्याजवळ बरेच पैसे झाले. ते कुजत न ठेवतां चाकरी संभाळून बसल्या बसल्या त्यांजवर कांहीं तरी व्यापार करावा असा मीं बेत केला. याजबद्दल मला फारशी खटपट करावी लागली नाहीं. पेढीवर देण्याघेण्याची मोठी घडामोड चालत होतीच, परंतु त्याशिवाय तिकडे कारखान्याचेंही कांहीं तुरळक काम चालत असे. तिकडे दररोज शंभर एक माणूस खपत असे. त्यांना काम करण्याकरितां बरींच हत्यारें लागत असत. तीं ते गांवांतच विकत घेत असल्यामुळें त्यांजबद्दल त्यांना पुष्कळ किंमत पडत असे. परंतु तींच शेफील्ड किंवा बर्मिंगह्याम एथील बाजारांत विकत घेतल्यास पुष्कळ स्वस्त्या दरानें मिळत असत. ह्मणून पेढीवरील मालकाकडून आठ दहा दिवसांची रजा घेऊन मी तिकडे गेलों व शंभर सवाशें रुपयांचा माल खरेदी केला. या व्यापारांत मीं असलेलें माझें सगळें भांडवल घातलें नाहीं. कारण कसा जरी व्यापार असला तरी त्यांत नफा नुकसान हीं नेहेमीं होतच असतात. ह्मणून भांडवलाचा कांहीं भाग राखून ठेवावा किंवा साधल्यास दुसऱ्या कांहीं व्यापारांत त्याचा उपयोग करावा असें मीं एका पुस्तकांत वाचलें होतें. असो, माल येऊन पोचल्यानंतर एक आठ-

वडा गेला नाहीं तों सर्व विकून फस्त झाला. खर्च वगैरे जाऊन शेंकडा अठरा टक्के मला नफा झाला व गिऱ्हाइकांसही पूर्वीपेक्षां पुष्कळ सोय झाली. याप्रमाणें लागेल तसा मीं आतां वरचेवर माल आणवूं लागलों. माझा व्यवहार चोख असल्यामुळें कांहीं दिवस गेल्यावर महिन्या दोन महिन्यांच्या मुदतीनें मला उधार मालही बराच मिळूं लागला व दिवसेंदिवस माझा व्यापार वाढत गेला. दीड दोन वर्षांच्या आंत माझ्याजवळ एकंदर पंधराशें रुपये भांडवल झालें. पेढीवरील कामाचा सपाटा फार असल्यामुळें माझा बहुतेक वेळ तिकडेच जात असे. यामुळें घरच्या व्यापारासंबंधीं देण्याघेण्याचे हिशेब माझी बायको ठेवीत असे. तिला लिहितां वाचतां येत असून हिशेबांची माहिती नव्हती ती मीं तिला फावल्या वेळेस करून दिली होती. या व्यापाराच्या संबंधानें आलेला माल वगैरे ठेवण्याकरतां आह्मांस एक खोली मात्र ज्यास्त घ्यावी लागली. एवढा काय तो आतां अधिक खर्च होऊं लागला. नाहीं तर बाकीची सर्व व्यवस्था पूर्वींप्रमाणेंच होती.

पेढीवरील कारखान्यांत एक मेस्त्री असे. तो आपल्या कामांत फार हुशार असून मोठा प्रामाणिक माणूस होता. परंतु दैववशात् एके दिवशीं त्याचा उजवाच हात यंत्रांत सांपडून मुळापासून तुटून पडला. यामुळें तो अगदीं लुला झाला व पोट भरण्यास त्याला कांहींच मार्ग राहिला नाहीं. त्याला मीं माझ्याजवळ चाकरीस ठेविलें. त्याची गांवांतील बहुतेक कारखान्यांत ओळख होती. ह्मणून डोकीवर माल देऊन विकण्याकरितां मीं त्याला तिकडे पाठवूं लागलों. अशानें माझा बराच ज्यास्त माल खपूं लागला व त्या बिचाऱ्याला-

ही अनायासें पोट भरण्याचा एक उद्योग मिळाला. कांहीं दिवस गेल्यावर माझा व्यापार पुष्कळच वाढला आणि त्याकरितां भाड्यानें मला एक वखार घ्यावी लागली व एक कारकूनही ठेवावा लागला. तरी हिशेबाची देखरेख बहुतेक माझ्या बायकोजवळच असे. फावल्या वेळेस मींही पण सर्व जमाखर्च वाचून पाहवा. याप्रमाणें लग्न होऊन चार एक वर्षे गेलीं नाहींत तों तेवढ्या अवकाशांत आह्मां उभयतांच्या मेहेनतीनें व शहाणपणानें आह्मांजवळ पंधरा हजार रुपयांची पुंजी झाली. शिवाय खर्च वगैरे जाऊन वर्षाकांठीं वीस बावीसशें रुपयांच्या प्राप्तीस कांहीं खोट नव्हती. तेव्हां मग चाकरी सोडून होईल तेवढा व्यापारच वाढवावा असा मीं बेत केला, आणि याजबद्दल पेढीवरील मालकाजवळ एक दिवस गोष्ट काढली. परंतु ती त्याच्या पसंतीस आली नाहीं. त्याचा माझ्यावर फार लोभ असे व कामाचीही आतां मला बहुतेक माहिती झाली होती यामुळें त्यानें मला एकदम अडीचशें रुपये पगार कबूल केला. पुष्कळ दिवसांची ओळख, तशांत राहण्याविषयीं त्याचा फारच आग्रह दिसून आला, यामुळें माझ्यानें त्याला नाहीं ह्मणवलें नाहीं आणि मी तिकडेच राहिलों. घरचा व्यापारही पूर्वीप्रमाणेंच चालू ठेविला. जाण्यायेण्यांत फार वेळ जाऊं नये ह्मणून वखारीवरच एक दुमजली हवाशीर बंगली होती तेथें मी राहण्यास गेलों व हाताखालीं तीनचार चाकर ठेवले. आमचें लग्न होऊन सरासरी सहा वर्षें झालीं. एवढ्या अवकाशांत माझ्या बायकोस एकंदर तीन मुलें झालीं. तीं सर्व शरीरानें सदृढ व निरोगी होतीं. याप्रमाणें आह्मीं मोठ्याआनंदानें व सुखा-

नें कालक्रमण करी असतां एकाएकीं सामानाच्या वखारीस आग लागून असलेलें आमचें बहुतेक सामान जळून नाहींसें झालें. एवढें एक बरें झालें कीं वखारीचा विमा उतरला असल्यामुळें विमेवाल्याकडून मला उक्ते पन्नास हजार रुपये मिळाले. याशिवाय लोकांकडून पांच सात हजार रुपये माझें येणें होतें. एवढ्या भांडवलावर कांहीं तरी स्वतंत्र व्यापार करावा अशाबद्दल पुष्कळ लोकांचें मत पडलें. शेफील्ड व बर्मिंगह्याम एथील व्यापाऱ्यांजवळ माझी बरीच साख होती. यामुळें आपल्याकडून लागेल तेवढा उधार माल देण्यास व दुसऱ्यांकडून देवविण्यास ते तयार झाले. परंतु कोणतेंही व कसेंही काम असलें तरी पेढीवरील मालकाच्या संमतीशिवाय मी कधींही करीत नसें. कारण त्याचे आपल्यावर पुष्कळ दिवसांचे उपकार असून तो मोठा भला माणूस होता. ह्मणून संधी पाहून त्याच्याजवळ मीं एक दिवस याजबद्दल गोष्ट काढिली. त्यालाही तो सर्व प्रकार खरा वाटला. परंतु माझी त्याला फार जरूर, यामुळें त्यानें मला महिना पाउणेचारशें रुपये पगार देऊं केला. हें त्याचें ह्मणणें मला व माझ्या बायकोस मान्य झालें व चाकरी संभाळून पुनः आह्मीं आमचा पूर्वींचा व्यापार सुरू केला. पेढीवर आतां माझा मानमरातब पुष्कळ वाढला. हाताखालीं तीन चार कारकून व सात आठ शिपाई आले. शहरच्या भरवस्तींत न राहतां गांवाबाहेर एक हवाशीर बंगला घेऊन मी तेथें राहण्यास गेलों. मुलांकरितां एक दोन दाया ठेविल्या. गाडी, घोडा, चाकरमाणसें, यांचाही बराच खर्च वाढला. यामुळें महिन्याकांठीं मला आतां

खर्चंच तीनचारशें रुपये येऊं लागला. प्राप्तीचा राहिलेला भाग इषकबाजीकडे न जातां शिलकेस पडत असे.

पेढीवरील मालक दोन भाऊ होते. ते जहाजांत बसून आयर्लंड देश पाहण्याकरितां ह्मणून निघून गेले. आणि कांहीं दिवस तिकडे राहून परत येतात तों दोघे भाऊ समुद्रांत बुडून मेले. त्यांपैकीं एकाचा एक वीस वर्षांचा मुलगा होता. तो पेढीवर कांहीं थोडेंबहुत काम पाहत असे. परंतु त्याला व्यापाराची फारशी माहिती नव्हती आणि तो थोडासा चैनी गडी होता. यामुळें मयत मालकांच्या जिनगीचे व्यवस्थाक होते त्यांनीं पेढीचें काम माझ्यावरच सोंपविलें आणि मला महिना सव्वासहाशें रुपये पगार केला. परंतु अशानें तिकडे माझा पुष्कळच वेळ जाऊं लागला आणि माझ्या स्वतःच्या व्यापारांत मोठी अडचण येऊन माझें अतिशय नुकसान होऊं लागलें. प्रकृतिही थोडी थोडी बिघडत चालली. ह्मणून कांहीं महिने गेल्यावर ही चाकरी सोडून स्वतः एक पेढी काढावी असा मीं निश्चय केला. याजबद्दल भांडवलाची माझ्याजवळ कमताई नव्हती. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें बाजारांत माझी सर्वत्र ओळख झाली असून तिकडे मीं माझी साखही उत्कृष्ट ठेवली होती. कामाच्या माहितीबद्दल ह्मणावें तर आज कांहीं महिने मीं तें काम चालवीत होतोंच. अशी पेढी निघाल्यास आपल्या पेढीचा व्यापार सुरळीत चालणार नाहीं असें पेढीच्या व्यवस्थापकांस वाटून त्यांनीं माझें भागीदारांच्या पटांत नांव घातलें व याउपर मीं दुसरा कोणताही व्यापार करूं नये असा आमचा ठराव झाला. जिवंत असे तोंपर्यंत पेढीवर

चाकरी करावी आणि नफ्यानुकसानास अर्धोअर्ध भागीदार व्हावें. याप्रमाणें आमचा करार झाल्यावर मीं माझा स्वतां चा व्यापार काढून टांकला. एक मोठी वाडी विकत घेतली आणि जवळच एक शानदार मोठा वगीचा केला. पांच सहा माळी ठेवले. एक मोठी फैटन गाडी करविली व घोड्यांच्या तीन चार जोड्या खरेदी केल्या. याप्रमाणें सरासरी हजार रुपयांवर माझा आतां एकंदर खर्च जाऊं लागला.

चार एक वर्षे गेल्यानंतर पेढीवरील जुन्या भागीदारास कांहीं आजार होऊन तो एकाएकीं मरण पावला. त्याला मांस भक्षण करण्याची फार चट असून दारू व तंबाखू वगैरे मादक पदार्थांचा तो अतिशयच लुब्ध असे. यामुळें बाहेरून जरी त्याचें शरीर चांगलें दिसत होतें आणि त्याच्या तोंडावर कांहींशी टवटवी होती; तरी आंतून त्याला जशी काय कीड लागली होती; आणि याच कारणावरून स्नान करीत असतां एके दिवशीं पाण्यांत फार वेळ राहिल्यामुळें त्याला थंडीचा विकार होऊन त्यांतच त्याचा अंत झाला. पुष्कळ औषधोपचार केले परंतु त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. एवढा अनर्थ होण्यास मुख्य कारण म्हटलें म्हणजे त्याचें तें दारूचें व्यसन. परंतु चमत्कार हा कीं, त्याच्या वैद्यानें म्हणून त्याला दारू प्यायाची सोड असें कधींही सांगितलें नाहीं. गिऱ्हाइकी ताजी ठेवण्याकरतां त्यानें आपलीं औषधें नेहेमीं चालू ठेवलीं होतीं. यजमानाची तबियत घुस्सा होईल आणि हातच गिऱ्हाईक नाहीसें होईल म्हणून तो अतिशय घाबरत असे आणि अशा रीतीनें त्यानें त्याचें तें दारूचें व्यसन फारच विकोपास नेलें होतें. परंतु माझी गोष्ट अशी नाहीं मी दारूला किंवा कोणत्याही मादक पदार्थाला स्पर्श देखील

करीत नाहीं. यामुळें पडसें खोकला शिवाय करून मला दुसरें कसलेंही दुखणें होत नाहीं, आणि वर्षानुवर्षें वैद्याची आणि माझी गांठही पडत नाहीं. माझ्या मुलांसही या दुष्ट व्यसनापासून दूर ठेवण्याबद्दल होतील तेवढे माझे सतत प्रयत्न चालू आहेत. मीं माझें मृत्युपत्र करून ठेवलें आहे आणि त्यांत माझ्या मुलांपैकीं जे कोणी मद्य व मांस यांचा निषेध करणार नाहींत त्यांस माझ्या मिळकतीमधून एक दमडी देखील मिळूं नये असें मीं लिहून ठेवलें आहे. असो; माझ्या भागीदारास कांहीं मुलें बाळें नसल्यामुळें पेढीची बहुतेक मालकी मलाच मिळाली. त्याची बायको होती तिला नफ्यानुकसानाचा एक हिस्सा व मला दोन हिस्से मिळावे अशी याउपर व्यवस्था झाली.

आमचें लग्न होऊन सरासरी सोळा वर्षें झालीं. एवढ्या काळांत मद्य व मांस हीं सोडल्यापासून आमची कसकशी बढती होत गेली हें दाखविण्याकरितां मीं लहानसें एक पुस्तक छापविलें आणि त्याच्या दोन हजार प्रती गांवांतील लोकांस फुकट वांटल्या. या पुस्तकांत मुख्य मुद्दा हा आहे कीं, मनुष्यानें दारू वगैरे मादक व निंद्य पदार्थांपासून होईल तेवढें दूर राहावें ; ह्मणजे त्याची शरीरप्रकृति नीट राहते, मनाला एका प्रकारची शांतता असते, पापपुण्याची भीति जागृत राहते, उत्साह वाढतो, आणि कोणच्याही प्रकारें आडमार्गानें जाण्यास त्याची प्रवृत्ति होत नाही. हें पुस्तक वाचून दीड दोन महिन्याच्या अवकाशांत मद्य व मांस यांचा अगदीं निषेध करणारीं अशीं आमच्या गांवांत चाळीस कुटूंबें निघालीं. त्यांत एक मोटा अंमलदार आहे. त्याला ह्यापूर्वीं वर्षाचा एकंदर

वीस हजार रुपये घरखर्च येत असे. परंतु हल्लीं मद्य व मांस हीं सोडल्यापासून सरासरी पंधरा एक हजारांच्या आंत त्याचा सर्व खर्च निभावत असून त्याची प्रकृतिही पूर्वीपेक्षां पुष्कळ चांगली झाली आहे. दुसरा एक वकील आहे. त्याच्या वैद्यानें तर त्याला दिवसांतून तीन वेळ सागोती खाण्यास सांगितलें होतें. आणि ती पचविण्याकरतां ह्मणून तिच्यावर त्याला दररोज दारूची एक सगळी बाटली फोडावी लागत असे. इतकें असून त्याच्या कपाळाचें औषध कांहीं एक दिवस चुकलें नव्हतें. यामुळें त्याची प्राप्ती जरी पुष्कळ होती तरी त्याच्या शिल्केस ह्मणून त्यांतील एक पै देखील राहत नसे. मिळालेला पैसा स्वाहा, अशी त्याची एकंदर व्यवस्था होती. परंतु त्यानें माझें शिष्यत्व संपादन केल्यापासून पूर्वीच्या निमपटीनें देखील त्याला खर्च येत नाहीं, व प्रकृतिही उत्कृष्ट असून वैद्याची क्वचितच त्याला गरज लागते. आणि दारूनें आजपर्यंत त्याचें सर्व शरीर होरपळल्याप्रमाणें जें झालें होतें तसें हल्लीं नसून अंगांत तखवाहो पूर्वीपेक्षां विशेष आला आहे. दुसरा आणखी एक पाद्री आहे. त्याची धर्मावर ह्मटली ह्मणजे मोठी श्रद्धा. परंतु त्याला देखील या दुष्ट व्यसनानें सोडलें नव्हतें. यामुळें तो बिचारा नेहेमीं कर्जबाजारी असे. त्याच्या नशीबाची भीक ह्मणून एक दिवस गेली नव्हती. धर्माच्या नांवानें कांहींना कांहीं तरी ढोंग करून याच्याजवळून कांहीं पैसे काढ, त्याच्या जवळून कांहीं पैसे काढ, असा त्याचा पुरातन क्रम चालला होता. परंतु आ

तां मिळकतीबाहेर त्याचा खर्च जात नसून वर्षा-कांठीं थोडी बहुत शिलकेस जमाच होते. या सर्व उदाहरणांवरून व माझ्या स्वतांच्या अनुभवावरून माझी अशी पक्की खात्री होते कीं, माझ्याप्रमाणें सर्व लोकां-नीं जर मद्य व मांस यांचा निषेध केला तर हल्लीं देशांत जें कांहीं दारिद्र्य आणि दुःख आहे, व चोरी, मारामारी, व खून वगैरे जे कांहीं असंख्य व भयंकर असे अपराध घडतात त्यांपैकीं निदान नंवद हिस्से तरी अगदीं नाहींसे होतील, व कराचा जो मोठा बो-जा आहे तो पुष्कळ अंशीं कमी होईल.

असो; या गोष्टीस आज वीस एक वर्षें होत आलीं. एवढ्या अवकाशांत माझा व्यापार उत्तम रीतीनें चाल-ला असून त्यामध्यें आजपर्यंत मीं बरेच पैसे कमावले. हल्लीं तिकडील बहुतेक व्यवस्था माझ्या मुलांच्या स्वा-धीन केली असून फक्त देखरेखीचें काम मात्र मीं माझ्याजवळ ठेवलें आहे. त्यांत जे कांहीं एक तास दोन तास जातात तेवढे शिवायकरून बाकी राहिल्ल्या वेळांत शास्त्रीय व धर्मसंबंधी वगैरे ग्रंथांचें मीं थोडें बहुत अवलोकन करीत असतों. त्यांत जरी माझी फारशी गति झालेली नाहीं तरी वेळ घालविण्यास तें मला एक मोठें उत्तम साधन मिळालें आहे. वाडींतील बा-गबगीच्याचें काम तर इतकें कांहीं मोठ्या सपाट्यानें चाललें आहे कीं त्यासंबंधानें मला वर्षाचा एकंदर खर्चच दहा हजार रूपये येतो. फळफळावळ व भाजीपाला व-गैरेंचें उत्पन्न बरेंच असून कोणताही जिन्नस बाहेरून फारसा विकत घेण्याची जरूर राहत नाहीं. मध्यभागीं

एक शानदार मोठा वाडा बांधला आहे, आणि त्यांत चित्रविचित्र रंगाचें नाना तऱ्हेचें सामान ठेवून त्याला मोठी शोभा आणली आहे. याप्रमाणें वर्षाचा एकंदर माझा तीस हजारांहून जास्त खर्च आहे, परंतु कमी नाहीं. तरी उत्पन्न त्याच्याहून सहापट ज्यास्त असल्यामुळें त्यामानानें ह्मणजे हा खर्च फार आहे असें नाहीं. शिवाय दानधर्मास व लोकोपयोगी कामांस मदत करण्याकडे वर्षांतून माझे तीस एक हजार रुपये जातात.

पेढीवरील लोक शिवायकरून नुस्त्या वाडीच्या संबंधानेंच माझ्याजवळ तीस पस्तीस चाकर आहेत. त्यांना महिना वीसापासून तों तीस रुपयांपर्यंत पगार मिळतो. शिवाय राहण्याकरतां प्रत्येकास वाडीमध्यें जवळच एकेक ल्हानच पण टुमदार अशी झोंपडी बांधून दिली आहे. तिकडे ते बायकामुलांसुद्धां राहतात. आंगणांत व आजूबाजूस फुलझाडें वगैरे लावून बागेस त्यांनीं मोटी शोभा आणली आहे. मागच्या बाजूस पेरू, जांब, सिताफळ वगैरे कांहीं कांहीं फळझाडें असतात. कोठें कोटें थोडा बहुत भाजीपाला केलेला असतो. या सर्वांचा ते लागेल तसा उपयोग करतात. घरांत होईल तेवढी स्वच्छता ठेवण्याविषयीं माझा त्यांस फार तगादा असतो. यामुळें भिंतींस आंतून व बाहेरून वर्षांतून एक एक वेळ तरी ते चुन्याचा हात फिरवितात. रंगाचे कागद वगैरे लावण्याची अगदीं मनाई आहे. व्यसनी मनुष्यास कशी जरी त्याची हुशारी असली तरी मी माझ्याजवळ कधींहीं चाकरीस ठेवीत नाहीं. यामुळें माझीं सर्व चाकरमाणसें दारूचशी काय परंतु तंबाखूचा देखील अगदीं निषेध करतात, आणि त्यांचीं बायकामुलें

देखील मोठीं सद्गुणी, विचारशील, व उद्योगी अशींच निपजतात. त्यांच्यामध्यें तंटेबखेडे कधीं होत नसून परस्परांशीं ते मोठ्या प्रेमभावानें वागतात. मुख्य माळी जो आहे त्याला मुलें बाळें वगैरे कांहीं नाहींत. परंतु त्याची बायको चांगली शिकलेली असून तिनें वाडींतील लहान मुलांकरतां एक शाळा घातली आहे. याजबद्दल वर्षाचे तिला सरासरी तीनशें एक रुपये मिळतात. दुसरा एक माळी आहे, तो मोठा धार्मिक माणूस आहे. दर रविवारीं आसपासच्या लोकांस जमवून कांहीं नेमलेला वेळ तो ईश्वरभजनांत घालवीत असतो. यामुळें माझ्या चाकरलोकांस कोस दीड कोस चालून देवळांत जाण्याची ज़रूरी राहत नाहीं. तशांत तिकडचा जो उपदेशक आहे तो मद्य व मांस यांचा मोठा भक्त असल्यामुळें त्याच्याजवळ मीं माझ्या लोकांस पाठवूं इच्छीत नाहीं. कारण तो जरी मोठा विद्वान पंडित आहे तरी त्याच्या या अशा अनाचारामुळें त्याची संगत झटली ह्मणजे तिजपासून अपायच फार व्हायाचा. असो; आमच्या या माळीबावाजवळ वाडींतील लहान मोठीं मिळून शंभर एक माणसें उपदेश ऐकण्याकरतां जमत असतात आणि तिकडे ते मोठ्या प्रेमल अंतःकरणानें ईश्वराचें स्तवन करतात. याशिवाय फावल्या वेळेस तो केव्हां केव्हां चांगल्या चांगल्या विषयांवर उपदेशपर व्याख्यानेंही देत असतो. तीं फार सुरस असल्यामुळें ऐकण्यास मंडळीची नेहमी गर्दी असते. त्यानें आणि मीं दोघांनीं मिळून श्रीमंत व गरीब कुटुंबांनीं खर्च किती व कसा करावा याजविषयीं ठळक ठळक असे कांहीं नियम शोधून काढले आहेत. त्यांत मुख्य नियम हा आहे कीं, प्रत्येक मनु-

ऱ्यानें—मग तो श्रीमंत असो किंवा गरीब असो—दुसऱ्याचें कर्ज ह्मणून बिलकुल न होऊं देण्याविषयीं फार सावधगिरी ठेवावी आणि आपल्या मिळकतीचा निदान तिसरा हिस्सा तरी दरमाहा शिलकेस टाकावा. ह्मणजे आपत्कालीं त्याला किंवा त्याच्या बायकामुलांस दुसऱ्याच्या दाराशीं जाण्याचा बहुधा प्रसंग येणार नाहीं. सोळा सत्रा वर्षांचा त्याचा एक मुलगा आहे. तो मोठा होतकरू असल्यामुळें त्याला एका विद्यालयांत शिकण्याकरतां ह्मणून मीं ठेवलें आहे. त्याचा सर्व खर्च मींच देत असतों. तिकडे लौकरच तो आपलें नांव काढील अशी माझी पुरी खात्री आहे. दुसरा एक मोठा मुलगा आहे. तोही असाच, परंतु तो फारसा शिकलेला वगैरे नाहीं. तरी त्याची हुशारी फारच वर्णनीय आहे. सोळा वर्षांचा झाला तेव्हां महिना वीस रुपये पगार देऊन त्याला मीं बागेंत काम करण्याकरतां ह्मणून ठेवलें होतें. तो मोठा विश्वासू व मेहेनती असल्यामुळें कांहीं दिवसांनंतर माझ्या शिफारशीवरून दुप्पट पगारावर त्याची एका बड्या मानकऱ्याच्या घरीं मुदपाकांत देखरेख करण्याच्या कामावर नेमणूक झाली. तिकडे खाण्यापिण्याची एकंदर लागेल तशी व्यवस्था होती. परंतु लहानपणापासून तो माझ्या हाताखालीं वागला असल्यामुळें मद्य व मांस हे दोन पदार्थ त्याला अगदीं वर्ज होते. त्यांस तो स्पर्श देखील करीत नसे. तसेंच त्याच्या नेहेमीच्या सहवासानें व उपदेशानें तिकडचे बहुतेक चाकर लोक त्याच्याप्रमाणेंच मद्य व मांस यांचा अगदीं निषेध करूं लागले. यामुळें यजमानास पूर्वींपेक्षां वर्षांतून पांच हजार रुपये कमी खर्च येऊं लागला. हें पाहून यजमानाची त्याच्यावर

वहालमर्जी झाली व त्यानें त्याला तीनचारशें रुपयांचें एक सोन्याचें घड्याळ बक्षीस दिलें. त्यावर त्यानें त्याचें नांव लिहिलें असून त्याची हुशारी व प्रामाणिकपणा यांजबद्दल फार तारीफ केली आहे. शिवाय चाळीस रुपये पगार होता तो त्याचा त्यानें सवाशें केला. यजमानाच्या मागें त्याच्या मुलानेंही त्याचा बराच इतमाम ठेवला आहे. मृत्युपत्रांत बापानें लिहून ठेवल्याप्रमाणें त्यानें त्याला अडीच हजार रुपये इनाम दिले व त्याचा पगारही पन्नास रुपये वाढविला. इतकें झालें तरी त्यानें आपलें खाणेंपिणें वगैरे पूर्वीप्रमाणेंच ठेवलें आहे. त्यांत कांहीं फेरफार केला नाहीं. हल्लीं वर्षाचें त्याला हजार रुपये पेन्शन मिळतें व वतनवाडी वगैरे मिळून एकंदरींत तो आज सत्तर ऐंशीं हजारांचा मालक आहे. त्याची बायकोही चांगली शिकलेली व मोठी संसारिक असून कशीद्याचें काम ती फार उत्तमरीतीनें जाणत असते. यामुळें तिचें स्वतांचें उत्पन्नही बरेंच आहे. त्याची अशी चांगली स्थिति पाहून खुद्द बापाला जसा व्हावा तसा मला आनंद होतो. त्याची एक वहीण आहे. ती झाली तरी अशीच. ती शिक्षकाचें काम करीत असते आणि या संबंधानें ती सरासरी सात आठ कुटुंबांत राहिली असेल. हीं सर्व कुटुंबें केवळ तिच्या उपदेशानें मद्य व मांस यांचा निषेध करणारीं अशीं झालीं आहेत. आज नाहीं म्हटलें तरी पंधरा वर्षें ती शिक्षकाचें काम करते. एवढ्या मुदतींत तिनें आपलें स्वतांचे चार हजार रुपये ब्यांकेंत ठेवले आहेत. तिला लहानपणीं मीं माझ्या मांडीवर खेळविलें असून स्वतांच्या मुलीप्रमाणें माझा तिच्यावर लोभ आहे. ह्यामुळें तिनें एक वेळ आपलें ब्यांकबुक मला दाखविलें. तें पाहून मला

मोठा आनंद झाला आणि त्यांत माझ्या पदरचे मीं आणखी एक हजार रुपये घातले. आणि तिला असें सांगितलें कीं, माझा जीवमान असे तोंपर्यंत जर तिनें पूर्वींप्रमाणें एकंदर दहा हजार रुपये सांठविलें तर त्या दहा हजारांचे मी पंधरा हजार करीन.

लग्न न झालेली माझी मोठी मुलगी आहे ती घरखर्चाचे आमचे सर्व हिशेव ठेवीत असून चाकर माणसांच्या वह्याही फावल्यावेळेस तपाशीत असते. यामुळें त्यांच्या हातूनही फारसा वावगा खर्च होत नाहीं. माझ्या मुलांस देखील माझें स्पष्ट सांगणें आहे कीं, उधळेपणा न करतां व्यवस्थेनें जे कोणी राहतील त्यांसच माझ्या मिळकतीचा मोठा भाग मिळेल. यामुळें माझीं सर्व मुलें विचारी व मर्यादशील अशीं असून, मोठीं झालीं तरी त्यांचें माझ्या आज्ञेवाहेर काडीमात्र देखील वर्तन होत नाहीं. याला मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे माझें व माझ्या वायकोचें वर्तन होय. कारण आह्मीं आईवापांनीं जसा कित्ता घालून द्यावा तसा बहुतकरून मुलें तो पुढें गिरविणार आहेत हें उघड आहे. माझा वाप आमच्या गांवीं पूर्वींच्याच ठिकाणीं राहत असून माझा व त्याचा नेहमी पत्रव्यवहार होत असतो. पुष्कळ दिवस मीं त्याला लागतील तसे पैसे पाठवून दिले. परंतु नंतर मला असें दिसून आलें कीं, त्या पैशांचा तो योग्य रीतीनें उपयोग करीत नसून ते तो वाईट कामास लावीत असतो. तेव्हां मी त्याला वर्षांतून पांचशें रुपयांवर एक पै देखील पाठविणार नाहीं असें साफ लिहिलें. आईस भेटण्याकरतां ह्मणून वर्षांतून एक वेळ मीं गांवीं जात असतों. आणि त्या वेळेस तिला जें कांहीं पोचविणें तें मीं स्वतः पोंचावितों. गांवीं गेलों ह्मणजे घरीं वापाजवळ मीं राहत नसून माझें बिऱ्हाड नेहमी

पृथक् असते. कारण माझ्या बापास जेवणाच्या वेळेस व नंतर देखील दारू शिवाय अगदीं चैन पडत नाहीं. चिरूट तर नेहेमीं तोंडांत बूच मारल्याप्रमाणें असलाच पाहिजे. शिवाय तपकिरीची डबी आठवड्यांतून निदान तीन चार वेळ तरी त्याला भरावी लागते. बसल्या बसल्या मीं एक दिवस असाच हिशेब केला तर मला असें दिसून आलें कीं त्यानें आजपर्यंत दारू, तंबाखू, व तपकीर यांप्रीत्यर्थ कमींत कमी एकंदर पंधरा हजार रुपये नाहक वाटेस लावले असतील. अशा मनुष्यास किती जरी पैसे मिळाले तरी ते थोडेच. पांचशेंच्या ठिकाणीं त्याला मीं हजार रुपये जरी पाठवून दिले असते तरी याचें कर्ज ह्मणून कधीं चुकलें नसतें. त्यांपासून दररोज दारूच्या बाटल्या मात्र कांहीं ज्यास्त फुटल्या असत्या आणि चिरूटांचो थोडीशी विशेष चंगळ झाली असती. एक वेळ आमचा असाच एक कोणी जवळचा आप्तसंबंधी होता तो वारला. तेव्हां त्यानें माझ्या बापास देण्याकरतां ह्मणून आठशें रुपये ठेवले होते. ती बातमी या राजश्रीस समजण्याची खोटी, त्या महिन्यास एकट्या पिठवाल्याचेंच त्याला पांचशें रुपये देणें. ह्मणून तो जरी माझा प्रत्यक्ष बाप आहे तरी पैशाच्या संबंधानें त्याच्याजवळ मला थोडासा हात आखडून धरावा लागतो. याजबद्दल मीं त्याला पुष्कळ मुलाच्या रीतीनें लिहिववेल तेवढें लिहिलें. परंतु तें कांहीं केल्यानें त्याच्या लक्षांत येईना. त्याचा आपला नेहमींप्रमाणें क्रम चालू. असेल त्या दिवशीं बाजीरावाचा डौल, नाहीं तर एकेक दिवस चुलींत विस्तव देखील पडण्याची मारामार. यांत त्याच्या स्वतांबद्दल मला फारसें वाईट वाटत नाहीं, परंतु त्याच्या बरोबर माझ्या आईचे फार

हाल होतात ह्मणून मी मोठा दिलगीर आहे. तसेंच तो वृद्ध झाला असून आतां फार थोड्या दिवसांचा सोबती आहे; परंतु त्याच्या सहवासानें माझे धाकटे भाऊ व बहिणी हीं बिघडतात याची मला फार भीति वाटते. याजकरतां एक वेळ मीं त्या सर्वांस माझ्या जवळ पाठवून देण्याविषयीं त्याला लिहिलें. त्याप्रमाणें त्यानें ती सर्व मंडळी पाठवून दिली. परंतु त्यांचे विचार व त्यांच्या रीतिभाती हीं सर्वच कांहीं विलक्षण आहेत. त्यांची अशी वाईट स्थिति झालेली आणि त्या सर्वांस माझा बाप कारण, हें पाहून मला मोठें वाईट वाटतें. माझी मोठी बहीण जी आहे ती फारच हेकेखोर असून तिला खोटा डौल फार पाहिजे. लोकांनीं आपल्यास श्रीमंत ह्मणावें ही तिला फार हौस. याकरतां दिवसांतून नाहीं नाहीं तीं तिला हजार ढोंगें करावीं लागतात. मिठाईवाला, कापडवाला, धोबी, दर्जी, माळी यांचीं नेहमी तिला कर्जें. यामुळें दाराशीं त्यांची दररोज कटकट असते. त्यांस भलभलत्या थापा देऊन त्यांची तिला समजूत करतां करतां पुरे वाट होते. केव्हां केव्हां शिव्यागाळीपर्यंत सुद्धां प्रसंग येतो. परंतु त्याची तिला मुळींच खंत वाटत नाहीं. आमचें एकंदर खाणें पिणें व माझ्या बायकोचा व माझा बातबेत आणि टाकठीकपणा हीं लौकरच तिला अगदीं आवडतनाशीं झालीं. तिनें आमची पहिल्या प्रतीच्या चिक्कूंत गणना केली. पैशाचा उपयोग कसा करावा हें देखील तिच्या मतें आह्मांस बरोबर समजत नाहींसें झालें. फार तर काय, परंतु आमच्या पोटाला देखील आह्मीं नीट खात नाहीं असें सुद्धां ती एक वेळ बोलून चुकली. याजबद्दल तिचा माझ्या बायकोवर फार कटाक्ष असून तिला ती खुजट

खुजट शब्दांनीं टोंचून फार बोलत असे. परंतु अशा प्रकारच्या दुसऱ्याच्या बोलण्याकडे आह्मीं फारसें लक्ष देत नसून आह्मांला जो कांहीं खरोखर योग्य वाटतो तेवढाच आह्मीं आमचा खर्च ठेवतों. तिचें नेहमी खाण्यापिण्यावर लक्ष. यामुळें सारा दिवस तिच्या खाण्यापिण्याच्या गोष्टी होत असत. त्यांशिवाय तिला दुसरें कांहींच सुचत नसें. सकाळीं दोन तीन तास दिवस आला ह्मणजे मग ती उठे. उठली ह्मणजे याच्याजवळ भांड, त्याच्या जवळ भांड, चाकर माणसांस शिवीगाळ कर, अशाखालीं तिचा बहुतेक वेळ जावा. तिची तबियत संभाळतां संभाळतां त्यांस तोबातोबा होत असे. चांगले चांगले उंची कपडे वापरण्याची तिला फार हौस, परंतु ते जागच्याजागीं नीट व्यवस्थेनें ठेवणें एवढें देखील तिच्या हातून होत नसे. स्वच्छतेच्या नांवानें तर भोंपळ्या एवढें पूज्य. त्याचें कांहीं वर्णन देखील करतां येत नाहीं. याप्रमाणें त्या सर्वांची स्थिति. अशांच्या सहवासानें आमचीं लहान मुलें बिघडतील याची आह्मांस आतां विशेष भीति पडली. आजपर्यंत आमचीं सर्व मुलें सकाळीं सहा वाजायाच्या अगोदर उठून आपापल्या कामास लागत असत. परंतु तींच आतां यांच्या संगतीनें आठ आठ वाजेपर्यंत निजूं लागलीं, आणि यामुळें स्वतांच्या कामांत त्यांचें थोडें थोडें दुर्लक्ष होऊं लागलें. हें पाहून माझ्या बायकोनें चहाचा बेत सकाळीं साडेसहा वाजण्याच्या आंत ठेवण्याविषयीं चाकर लोकांस सख्त हुकूम केला. यामुळें आमची मुलेंचशीं काय परंतु ती आलेली सर्व मंडळी देखील आपापले कपडे वगैरे घालून त्यावेळेच्या आंत चहा पिण्याकरतां तयार होऊं लागली. याप्रमाणें दुसऱ्या अनेक

रीतीनें या मंडळीपासून आह्मांस त्रास होऊं लागला. चाकर लोकांशीं नेहेमी भांडणें होऊं लागलीं. यामुळे पुष्कळ दिवसांचे आमचे इमानी नोकर होते ते देखील भडाभड चाकरी सोडून जाऊं लागले. मुलांच्या तोंडून आजपर्यंत अपशब्द ह्मणून कधीं निघत नसे, परंतु तीं देखील आतां तोंडावाटे नाहीं नाहीं ते शब्द काढूं लागलीं. आपापसांत शिव्या गाळी होऊं लागल्या. कांहीं बोलूं गेल्यास प्रत्युत्तर मिळूं लागलें. आणि अशा रीतीनें थोड्या दिवसांत आमच्या घरांत जें कांहीं शिक्षण व मानमर्यादा होती तीं या लोकांच्या संगतीनें नाहींशी होत चालली. तेव्हां मीं त्यांना एक निराळें घर दाखवून दिलें आणि त्यांच्याकरतां शंभर सवाशें रुपयांचा निराळा खर्च ठेवला. तिकडे त्यांनीं लागेल तसें खावें, प्यावें, आणि मजा मारावी. असें जरी झालें तरी त्यांतील बहुतेक मंडळी आमच्या घरींच नेहमीं पडलेली असे आणि आजपर्यंत जरी आमचें खाणें पिणें त्यांना अगदीं आवडत नव्हतें तरी आतां दररोज जेवायाला त्यांतली अर्धी अधिक मंडळी आमच्या इकडेसच राहूं लागली. अशा रीतीनें तेवढ्या त्या रुपयांत त्यांस मद्य व मांस यांची लागेल तशी चंगळ करतां येऊं लागली. तरी एवढ्यानें त्यांची तृप्ति झाली नाहीं. त्यांनीं मला नकळत मनमानें लागतील तशीं कर्जें काढली. कोणीं घड्याळें, कोणीं अंगठ्या, कोणीं कांहीं कोणीं कांहीं, अशा रीतीनें वाटेल तसा माझ्या नांवावर त्यांनीं सौदा केला, आणि यामुळें नंतर ते सर्व पैसे मला द्यावे लागले. एका सहा महिन्याच्या आंत त्यांनीं हा इतका घोंटाळा करून सोडला. तेव्हां त्यांस लाकेरच बापाजवळ परत पाठविण्याची मीं तजवीज केली. परंत

कांहीं केल्यानें त्यांचा जाण्याचा बेत लौकर होईना. त्यांच्या मनांतून माझ्याजवळच राहून लागेल तशी चैन मारावी. तेव्हां मीं एक याच्याबद्दल युक्ति काढली. ती अशी कीं पुष्कळ दिवस एकाच ठिकाणीं राहिल्यामुळें माझ्या बायकोच्या मनांतून कोठें तरी समुद्रकिनाऱ्याच्या गांवांत जाऊन कांहीं दिवस राहवें असें होतें. परंतु कामाच्या नडीमुळें आजपर्यंत तसा योग घडून आला नव्हता. आतां या मंडळीस घालविण्यास ही संधी बरी आहे असें वाटल्यावरून आह्मीं आयर्लंड देशांत समुद्रकांठावर कांहीं उंच प्रदेश आहेत तिकडे जाण्याकरतां निघालों. तेव्हां निरुपाय होऊन ती सर्व मंडळी आपापल्या गांवीं निघून गेली. याजबद्दल खरोखर मला मोठें वाईट वाटलें, परंतु केवळ नाइलाजास्तव मला तसें करणें भाग पडलें. कारण पैशाकरतां ह्मणजे मीं घाबरत होतों असें नाहीं. त्याची माझ्याजवळ पुष्कळ समृद्धि होती. परंतु त्यांच्या त्या रीतिभाति, तो खादाड स्वभाव, आणि ती खोटी मिजास, हीं मला बिलकुल आवडत नसत. त्यांनीं तशा स्थितींतच राहवें हें देखील मला बरोबर वाटलें नाहीं. ह्मणून कांहीं दिवसांनीं आयर्लंड देशांतून परत आल्यावर मीं त्या सर्वांस एक उपदेशपर पत्र लिहिलें, आणि तें छापवून प्रत्येकास त्याची एकेक प्रत पाठविली. त्यांत त्यांची एकंदर स्थिति वर्णन केली असून तिचा परिणाम मोठा भयंकर आहे असें सिद्ध करून दाखविलें आहे. मद्यप्राशनादि दुष्ट व्यसनांपासून दूर राहाण्याबद्दल सर्वांस पुनः एकवार विनंती केली आहे आणि असें जे कोणी करणार नाहींत त्यांस माझ्याकडून कोणत्याही रीतीनें मदत होणार नाहीं असें देखील त्यांत स्पष्ट लिहिलें आहे. परंतु

त्यांच्या वर्तनांत तिळमात्र देखील अद्याप फेर पडल्याचें दिसून येत नाहीं. आह्मीं एकंदर भाऊ व बहिणी मिळून दहा बारा असामी आहों. परंतु हल्लीं माझ्याशिवाय एकाची देखील खाऊन पिऊन चांगली स्थिति आहे असें नाहीं. लहानपणीं घर सोडलें तेव्हां आमचा एक चुलता होता. त्यानें मरायाच्या वेळेस माझ्या भावांस देण्याकरतां ह्मणून बरेच पैसे ठेविले होते आणि यामुळें त्यांचा अभ्यासही थोडा बहुत झाला होता. मला मात्र कोणी पैसे वगैरे कांहीं दिले नाहींत आणि शाळेंतही माझें फार दिवस राहणें झालें नाहीं. परंतु ईश्वराच्या कृपेनें तशा स्थितींतच माझ्या मेहेनतीस यश मिळालें आणि त्या सर्वांस पोसण्याचें माझ्या अंगीं सामर्थ्य आलें. त्यांनीं कांहीं तरी उद्योग धंदा करावा ह्मणून त्यांच्याकरतां मीं नाहीं ह्मटलें तरी सरासरी दीड एक लाख रुपये खर्च केले असतील. परंतु त्यांचें तिकडे मुळींच लक्ष नाहीं. फक्त खावें, प्यावें, आणि मजा मारावी, एवढेंच त्यांस समजतें. या पलीकडे ते कशाचीच परवा करीत नाहींत. उद्यां आपली वाट काय होईल याची कल्पना देखील त्यांच्या मनांत नाहीं. यामुळें त्यांचा जेवढा संबंध तुटेल तेवढा मीं तोडीत आहें. लोकाचारास स्मरून अन्नवस्त्राची त्यांस ददात पडूं नये एवढी मात्र मीं तजवीज ठेवली आहे.

माझें एकंदर ऐश्वर्य जरी अशा प्रकारचें आहे तरी या सर्वांहून मला एक मोटी आनंद मानण्याजोगी गोष्ट आहे. ती अशी कीं माझीं सर्व मुलें नीट व्यवस्थेनें आहेत. त्यांस कोणत्याही प्रकारचें दुर्व्यसन नसून तीं सर्व माझ्या आज्ञेंत आहेत. त्यांची शरीरप्रकृति चांगली आहे, व त्या सर्वांस मीं कांहींना कांहीं उद्योग लावून दिला आहे. त्यांचें खाणें

पिणें व एकंदर चालचलणूक ही सर्व माझ्याप्रमाणेंच आहेत. त्यांच्याहातून वावगा खर्च कधीं होत नाहीं व स्वतांच्या प्राप्तिप्रमाणें एकेकानें जवळ पैसाही बरेच केले आहेत. दानधर्माकडे त्यांचें विशेष लक्ष आहे व एकंदरींत नांव ठेवण्यास ह्मणून त्यांच्यामध्यें कांहीच जागा नाहीं. त्यांस पाहून मला मोठा आनंद होतो व माझ्या अवघ्या श्रमांचे सार्थक झालें असें मला वाटूं लागतें. या सर्व सुखास माझा स्वतःचा उद्योग व दूरदर्शीपणा हे गुण जरी कांहीं अंशीं कारण झाले आहेत, तरी माझी बायकोही माझ्या योग्यतेचीच मिळाली असल्यामुळें माझा संसार ह्मणजे केवळ दुधांत साखर याप्रमाणें झाला आहे. ती जर तशी नसती तर यांतील बहुतेक सुखास मीं खचित अंतरतों. तिचा शांत व विचारी स्वभाव, ठाकठीकपणा, नेहेमींची समाधान व आनंदित वृत्ति हीं केवळ वर्णनीय आहेत. या गुणांनीं स्त्रियांच्या अंगभूत सौंदर्यास कांहीं विशेष शोभा येते व त्या अधिक मनोहर दिसूं लागतात. अशा स्त्रियांचा सदैव सहवास असला ह्मणजे पुरुषांची प्राज्ञा नाहीं, कीं ते वाईट मार्गानें जातील. आपल्या सद्गुणांनीं खरोखर त्या त्यांस उच्चत्वाप्रतच नेतील.

असो, याप्रमाणें मीं माझी असलेली खरी हकीकत सांगितली आहे. ईत गर्वोक्तीचा माझ्यावर आरोप येऊं नये ह्मणून माझें नांव मात्र मीं कळविलें नाहीं. तरी त्यापासून ह्मणजे कांहीं विशेष झालें असतें असें नाहीं. हें सर्व कथानक सांगण्याचा माझा एवढाच आशय आहे कीं, माझ्याप्रमाणें सर्व लोकांनीं आपापलें वर्तन ठेवावें, आणि त्यापासून त्यांचें इहलोकीं कल्याण व्हावें.

**समाप्त.**